महाराष्ट्र शासन
प्राथमिक शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंटमार्ग, पुणे-४११००१.दुरध्वनी- ०२०२६१२५६९२ई-मेल:- **depmah2@gmail.com**

जा. क्र. आरटीई २५%/२०२५/८०१/ 113 दि. १०-०१-२०२५

**प्रति,**

**श्रीम. आदिती एकबोटे**
**वरिष्ठ तांत्रिक संचालक,**
**एनआयसी पुणे**

**विषय :- सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेशासाठी बालकाचे वय निश्चित करण्याबाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. आरटीई-२०१९/प्र.क्र.११९/एस.डी.-१, दि. २५-०७-२०१९
२. शासन निर्णय क्र. आरटीई-२०१८/प्र.क्र.१८०/एस.डी.-१, दि. १८-०९-२०२०.

उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात आरटीई २५ टक्के शाळा प्रवेशासाठी बालकाचे वय निश्चित करण्याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याबाबत दि. १८-०९-२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मानवीन दिनांक ३१ डिसेंबर करण्यात आला आहे. शासनाने किमान वयोमर्यादा ठेवलेली आहे. संदर्भीय शासन निर्णयान्वये पूर्व प्राथमिक व इयत्ता १ली मधील शाळा प्रवेशासाठीचे किमान वय खालीलप्रमाणे निश्चत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रवेशाचा वर्ग | किमान वय वर्ष | वयाबाबत मानीव दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्ले ग्रुप / नर्सरी (इ. १ली पूर्वीच्या ३ रा वर्ग) | ३+ | ३१ डिसेंबर |
| २ | इयत्ता १ ली | ६+ | ३१ डिसेंबर |

शासन निर्णय दि. २५-०७-२०१९ नुसार शाळा प्रवेशासाठीचे किमान वयामध्ये जास्तीत जास्त १५ दिवसांची शिथिलता देण्यात आलेली आहे. तरी उपरोक्त प्रमाणे आरटीई २५ टक्के सन २०२५-२६ च्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी.

(शरद गोसावी)
**शिक्षण संचालक (प्राथमिक)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.**

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे